# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.05.2026** **वारः गुरुवार**

1. भारत-इटली संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा एक व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट निश्चित करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. महाराष्ट्राला अणुऊर्जा उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार
3. 'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे'चे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर आणि स्वाती चिटणीस यांना जाहीर
4. औषध विक्रेता संघटनेच्या बंदला अनेक ठिकाणी प्रतिसाद आणि
5. भोंदू खरातला 26 मे पर्यंत ईडी ची कोठडी

**<u>मोदी इटली दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रोम मध्ये, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली; अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये भारत आणि इटली यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करणं हा या चर्चेचा उद्देश होता. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि धोरणात्मक भागीदारी या क्षेत्रांमधील सहकार्य वाढविण्यावर या बैठकीत प्रामुख्याने भर देण्यात आला. उभय नेत्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही चर्चा केली. या चर्चेतून भारत आणि इटली यांच्यातील वाढती धोरणात्मक भागीदारी अधोरेखित झाली, तसंच आर्थिक सहकार्य आणि दोन्ही देशांतील जनतेचे परस्परांशी असलेले संबंध विस्तारण्यावर यात विशेष भर देण्यात आला.

चर्चेनंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त वार्ताहर परिषदेला संबोधित केलं.

भारत-इटली द्विपक्षीय संबंधांसाठी, संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा 2025-2029, एक व्यावहारिक आणि भविष्यवेधी चौकट निश्चित करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं.

जलवाहतूक, बंदरांचं आधुनिकीकरण, दळणवळण आणि सागरी अर्थव्यवस्था या क्षेत्रांमध्येही दोन्ही देश एकत्र काम करतील, असं मोदी यांनी नमूद केलं. भारत-इटली नवोन्मेष केंद्र स्थापन करण्यावर काम सुरू असल्याची माहितीही मोदी यांनी दिली. दोन्ही देशांमधील मैत्री, आदर आणि परस्पर विश्वासावर आधारित असल्याचं मेलोनी यांनी यावेळी सांगितलं.

भारत आणि इटली यांच्यातील संबंध आता निर्णायक पातळीवर कसे पोहोचले आहेत, याचं सविस्तर विश्लेषण करणारा एक विशेष लेख इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या समवेत आपण लिहिला असल्याचं, मोदी यांनी समाजमाध्यमावर सांगितलं आहे.

**<u>अणुऊर्जा</u>**

अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचं नेतृत्व करण्यास, महाराष्ट्र  तयार असून, अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. 'यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया' अंतर्गत आयोजित, अणुऊर्जा संस्था आणि, अमेरिका आणि भारत यांच्यातील धोरणात्मक भागीदारी मंचाच्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार असून महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा, ग्राहक म्हणून नव्हे, तर अणु उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार आहे. यासाठी राज्याकडे सक्षम औद्योगिक यंत्रणा, जागतिक दर्जाची बंदरे, लॉजिस्टिक सुविधा, तांत्रिक कौशल्य असलेलं मनुष्यबळ, अभियांत्रिकी क्षमता आणि उद्योगपूरक धोरणं उपलब्ध असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात अणुऊर्जा उत्पादन आणि प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

या बैठकीला  ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह अनेक विभागांचे सचिव, सल्लागार, अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, अमेरिका-भारत धोरणात्मक भागीदारी मंचाच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, अनेक कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, औद्योगिक तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळी असल्यानं इथं गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचं मारिया कोर्सनिक यांनी नमूद केलं.

**रॅपिडो-करार**

राज्यातील डिजिटल जनजागृती, डिजिटल समावेशन आणि सुरक्षित मोबिलिटी परिसंस्था मजबूत करण्यासाठी रॅपिडो आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या सहकार्याअंतर्गत 'आपले सरकार', 'महा आयडी', 'महासारथी' यांसारख्या नागरिकाभिमुख डिजिटल सेवा आणि महाआयटीच्या विविध सार्वजनिक मंचांबाबत जनजागृती आणि वापर वाढविण्यासाठी, रॅपिडोचं तंत्रज्ञान आणि नेटवर्क उपयोगात आणलं जाणार आहे.

**तुटवडा**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नसून गरजेच्या प्रमाणात इंधनसाठा उपलब्ध असल्याचा मुख्यमंत्र्यांनी पुनरुच्चार केला. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून गरजेपेक्षा जास्त इंधन भरण्याचा प्रयत्न केल्यास पुरवठा साखळी विस्कळीत होते; त्यामुळे इंधनाचा काटकसरीने वापर करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. फडणवीस यांनी काल मुंबईत विविध मुद्द्यांवर पत्रकारांशी संवाद साधला.

**जातनिहाय गणना**

सर्वोच्च न्यायालयानं आगामी जनगणनेत, जातनिहाय गणना करण्याच्या, केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका काल फेटाळली. हा विषय सरकारच्या धोरणात्मक कक्षेत येत असल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील पीठानं, मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना आखण्यासाठी त्या वर्गातील लोकसंख्येची माहिती सरकारकडे असणं आवश्यक असल्याचं नमूद केलं. अशा प्रकारची माहिती संकलित करण्यात काहीही अयोग्य नसल्याचं स्पष्ट करत न्यायालयानं या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

**जीवन गौरव पुरस्कार**

'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे'चे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस आणि ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना जाहीर झाले आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीनं, दरवर्षी, नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ 14 जूनला पुरस्कार वितरण सोहळा आणि कलावंत मेळावा आयोजित करण्यात येतो.  या सोहोळयात सर्वोत्कृष्ट लेखक, दिग्दर्शक,अभिनेता, यासह इतर अनेक पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**मसाप**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 121वा वर्धापन दिन समारंभ आणि पुरस्कार प्रदान सोहळा मंगळवार 26 मे ला  पुण्यात आयोजित करण्यात आला असून, ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांचा, 'मसाप जीवनगौरव' पुरस्काराने तर, डॉक्टर श्रीकृष्ण काकडे यांचा, 'डॉक्टर भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता' पुरस्काराने गौरव केला जाणार आहे, अशी माहिती प्रमुख कार्यवाह डॉक्टर स्वाती महाळंक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग आणि मराठी

भाषा विभाग मंत्री उदय सामंत यावेळी प्रामुख्यानं उपस्थित असणार आहेत. या प्रसंगी विविध पुरस्कार तसंच विशेष ग्रंथपुरस्कार, वार्षिक ग्रंथ पारितोषिकं प्रदान केली जाणार आहेत.

**औषध विक्रेता बंद**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या बंदला काल राज्यातील विविध भागातून मोठा प्रतिसाद मिळाला. ऑनलाईन औषध विक्रीमुळे औषध व्यवसायाला मोठा फटका बसत असून, डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधांची विक्री, बनावट औषधांचा सुळसुळाट अशा अनेक घातक गोष्टी घडत आहेत, यामुळे रुग्णांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती औषध विक्रेत्यांच्या संघटनेनं व्यक्त केली. ठाणे शहरातील सर्व 800 औषध विक्रेत्यांनी काल दिवसभर आपली दुकाने बंद ठेवली. बीड शहरात मुक मोर्चा काढण्यात आला तर नागपूरमध्ये संविधान चौकात निदर्शनं करण्यात आली. सांगली जिल्ह्यातील 4 हजार 200 औषधविक्रेते मोर्चात सहभागी झाले होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही चार हजार औषधविक्रेत्यांनी बंदमध्ये सहभाग घेतला. हिंगोली, परभणी, धुळे, सोलापूर, यवतमाळ जिल्ह्यातही या बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कोकणातल्या चार हजार, तर रत्नागिरी जिल्ह्यातल्या सुमारे साडे सातशे औषधविक्रेत्यांनी आपली दुकानं बंद ठेवली होती अशी माहिती, या संघाचे कोकण विभाग उपाध्यक्ष उमेश शिंदे यांनी दिली. या संपाच्या काळात आपत्कालीन स्थिती लक्षात घेता रुग्णालयांच्या आवारातील औषध विक्रीची दुकाने सुरू ठेवण्यात आली होती.

**खरात**

सक्तवसूली संचालनालयानं, भोंदू अशोक खरातला अटक केल्यानंतर काल मुंबईतील विशेष पी एम एल ए न्यायालयानं त्याला कथित 70 कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणात, 26 मेपर्यंत ईडी कोठडी सुनावली. अशोक खरातवर बेनामी बँक खात्यांचं जाळं वापरून, 70 कोटींपेक्षा अधिक रकमेचा घोटाळा केल्याचा, तसंच, खंडणी टोळी चालवल्याचा गंभीर आरोप आहे.

**हवामान**

विदर्भ वगळता राज्यात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे तर विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.